दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ रविवार, दि. ०७ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ४८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


### कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन, मोदी सरकार बॅकफूटवर

देशातील शिक्षण व्यवस्थेला लागलेली पेपर लीकची कीड आणि त्यामुळे त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर शनिवारी एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक आंदोलन संपन्न झाले. 'कॉकरोच जनता पार्टी' या नवीन संघटनेच्या वतीने आयोजित या आंदोलनात हजारो संतप्त युवक आणि युवतींनी सहभाग नोंदवला होता.

---> अग्रलेख - पान 2 वर

### कोल्ह्याची दहशत! चिमुकल्यासह 11 जण जखमी; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांच्या घटना सातत्याने समोर येत असताना आता कागल तालुक्यात एका कोल्ह्याने नागरिकांची झोप उडवली आहे. बिबट्या, गवा आणि टस्करनंतर आता कोल्ह्याच्या हल्ल्यांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कोल्ह्याने आतापर्यंत ११ जणांना जखमी केल्याची माहिती समोर आली आहे. कागल तालुक्यातील बोरवडे-मालवे परिसरातील मगदूम वसाहतीत गुरुवारी सायंकाळी ही घटना घडली.

# केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या हकालपट्टीसाठी सरकारला सात दिवसांचा अल्टिमेटम; आंदोलनामुळे राजकीय वातावरण तापले

## काँग्रेस वगळता संपूर्ण विरोधी पक्षाकडून आंदोलनाचे स्वागत; तर काँग्रेसची 'वेट अँड वॉच'ची भूमिका










**नवी दिल्ली :** देशातील शिक्षण क्षेत्रातील वाढत्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर 'कॉकरोच जनता पार्टी'ने केंद्र सरकारला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटवण्यासाठी सात दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या मागणीसाठी राजधानीतील जंतर-मंतर मैदानावर शनिवारी एक मोठे विरोध-प्रदर्शन करण्यात आले. काँग्रेस पक्ष वगळता देशातील इतर प्रमुख विरोधी दलांनी या आंदोलनाचे जाहीर स्वागत केले असून, हे आंदोलन देशातील तरुणांमधील तीव्र निराशा आणि संताप व्यक्त करणारे असल्याचे म्हटले आहे. या आंदोलनामुळे दिल्लीतील राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळबळ उडाली आहे.

या संपूर्ण प्रकरणावर काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी अत्यंत सावधगिरी बाळगत मौन बाळगणे पसंत केले आहे. पक्षाच्या अंतर्गत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या नवीन संघटनेला आम आदमी पार्टीचा छुपा पाठिंबा असल्याचा संशय काँग्रेसला आहे. त्यामुळेच काँग्रेसने सध्या या विषयावर 'वाट पाहा आणि परत पाहा' असे धोरण अवलंबले आहे. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी या संघटनेच्या सोशल मीडियावरील अचानक वाढलेल्या प्रभावावर आणि राजधानीत एवढ्या मोठ्या आंदोलनासाठी दिल्ली पोलिसांनी दिलेल्या परवानगीवर तीव्र संशय व्यक्त केला आहे. जिथे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना संवेदनशील ठिकाणी जाण्यापासून वारंवार रोखले जाते, तिथे या नवीन संघटनेला इतकी सहज परवानगी कशी मिळते, असा सवाल काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागाच्या प्रमुख सुप्रिया श्रीनेत यांनी उपस्थित केला आहे. त्यांनी नाव न घेता सांगितले की, काँग्रेस पक्ष नेहमीच तरुणांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला असून गेल्या एका महिन्यात पक्षाने पेपर लीकच्या विरोधात देशभरात पन्नासपेक्षा जास्त आंदोलने केली आहेत.

दुसरीकडे, काँग्रेसच्या मित्रपक्षांनी मात्र या आंदोलनाला उघड पाठिंबा दिला आहे.

-> पान 2 वर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी या आंदोलनाची गंभीर दखल घेत एक मोठे वक्तव्य केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, ज्यांना आपण देशाचे भविष्य म्हणतो ते हजारो तरुण आज चिलचिलाती उन्हात रस्त्यावर उतरले आहेत, त्यामुळे या आंदोलनाला आणि या शक्तीला कोणीही कमी लेखण्याची चूक करू नये.

आम आदमी पार्टीचे नेते अरविंद केजरीवाल यांनी देखील केंद्र सरकारवर निशाणा साधत, आंदोलन करणाऱ्या तरुणांना देशविरोधी म्हणण्याऐवजी पंतप्रधानांनी तातडीने शिक्षणमंत्र्यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी केली आहे.

# वाळू माफियांना अभय देणे तहसीलदारांना भोवले; 6 लाख 40 हजाराची लाच घेताना जाळ्यात

## अंबडचे स्वयंघोषीत 'सिंघम' तहसीलदार विजय चव्हाण एसीबीच्या सापळ्यात

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीवर कारवाई न करण्यासाठी तब्बल ६ लाख ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) शनिवारी रंगेहात पकडले. महसूल विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यावर झालेल्या या धडक कारवाईमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून महसूल यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एसीबीकडे दाखल झालेल्या तक्रारीनुसार, तक्रारदाराकडून वाळू उपसा करणाऱ्या एका पोकलँड मशीनवर कारवाई न करणे तसेच वाळू वाहतूक करणारे सहा हायवा ट्रक विनाअडथळा सुरू ठेवण्यासाठी तहसीलदार विजय चव्हाण यांनी मोठ्या रकमेची मागणी केली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्याने एसीबीने सापळा रचला.

बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी छत्रपती संभाजीनगर येथे कारवाई करण्यात आली. ठरल्याप्रमाणे तहसीलदार विजय चव्हाण यांनी ६ लाख ४० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात ताब्यात घेतले. त्यामुळे जिल्ह्यातील महसूल वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

या कारवाईतील विशेष बाब म्हणजे, लाचेची मागणी अवैध वाळू उपसा करणाऱ्या एका पोकलँड मशीनसह सहा हायवा ट्रकांवरील कारवाई थांबविण्यासाठी करण्यात आल्याचा आरोप आहे. म्हणजेच केवळ एका वाहनासाठी नव्हे, तर अवैध वाळू वाहतुकीच्या संपूर्ण साखळीला संरक्षण देण्याच्या बदल्यात ही रक्कम मागण्यात आल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी काही जणांचा सहभाग आहे का, याबाबतही तपास यंत्रणा माहिती गोळा करीत आहे.

जालना जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीच्या तक्रारी सातत्याने समोर येत असताना कारवाईची जबाबदारी असलेले तहसीलदारच लाच स्वीकारताना पकडले गेल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. नदीपात्रांमधून होणाऱ्या अवैध उत्खननामुळे शासनाच्या महसुलाला फटका बसत असल्याच्या तक्रारी वारंवार होत असताना ही कारवाई विशेष महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, आरोपी तहसीलदारांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून त्यांची सखोल चौकशी केली जात आहे. लाचेची रक्कम, व्यवहाराची पार्श्वभूमी, तसेच अवैध वाळू वाहतुकीशी संबंधित इतर बाबींचा तपास एसीबीकडून सुरू आहे. या कारवाईनंतर जिल्ह्यातील महसूल विभागातील अधिकाऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून संपूर्ण प्रकरणाची चर्चा राज्यभर सुरू झाली आहे.

# सराफ दरोडा प्रकरणातील संशयित आरोपीचा सोलापूर पोलिसांवर गोळीबार; आरोपी फरार

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** सोलापूर जिल्ह्यातील सराफ व्यापाऱ्याच्या दरोडा प्रकरणातील संशयित आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकावर आरोपीने गोळीबार केल्याची पाथर्डी तालुक्यातील खरवंडी येथे घडली. या गोळीबारात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. आरोपी पावलस उर्फ मेहेर कचरू गायकवाड (रा. खरवंडी कासार, ता. पाथर्डी) हा आपल्या साथीदारांसह घटनास्थळावरून फरार झाला. या प्रकरणी गायकवाड सह दोन ते तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. &सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील जेऊर येथील सराफा व्यापारी अभिनंदन काशिनाथ पोद्दार यांना अडवून त्यांच्याकडील सोने लुटल्याप्रकरणी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता..

सदर गुन्ह्याचा समांतर तपास सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू होता. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे या दरोड्यात पावलस उर्फ मेहेर गायकवाड याचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय आत्माराम शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पथक पाथर्डी येथे दाखल झाले. पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांच्या समन्वयाने खरवंडी कासार बीटचे पो. कॉ. आसाराम बटुळे व गृहरक्षक मिठू खेडकर यांची मदत घेऊन आरोपीचा शोध सुरू करण्यात आला होता.

-> पान 2 वर

# कानिफनाथ घाटात ट्रॅव्हल्स पलटी; प्रवाशांना लाभले भाग्य

## पहाटेच्या अंधारात तीव्र वळणावर चालकाचा ताबा सुटला; अंभोरा पोलीस आणि ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला



**कडा :** अहिल्यानगर ते बीड राज्य महामार्गावर आष्टी तालुक्यातील घाटा पिंपरी परिसरातील कानिफनाथ घाटात पहाटेच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. पुण्यावरून नांदेडकडे निघालेली प्रवाशांनी गच्च भरलेली एक खाजगी ट्रॅव्हल्स अचानक पलटी झाली. या भीषण अपघातामुळे घाटात काही काळ अत्यंत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, प्रवाशांचे नशीब बलवत्तर असल्यामुळे बसमधील सर्व प्रवासी सुरक्षित बचावले असून एक मोठी दुर्घटना सुदैवाने टळली आहे.

पाटोदा येथील नूर ट्रॅव्हल्स कंपनीची बस प्रवाशांना घेऊन पुण्याहून नांदेडच्या दिशेने प्रवास करत होती. पहाटे चार वाजेच्या सुमारास बस कानिफनाथ घाटातील अत्यंत तीव्र वळणावर आली असता, चालकाचा वाहनावरील ताबा अचानक सुटला. वाहनाचा वेग जास्त असल्यामुळे बस थेट रस्त्यावरच आडवी झाली. अपघाताच्या वेळी बहुतांश प्रवासी गाढ झोपेत होते. अचानक झालेल्या या मोठ्या अपघातामुळे प्रवाशांमध्ये प्रचंड गोंधळ उडाला आणि बसमधून रडारडी व आरडाओरडा सुरू झाला.

या घटनेची माहिती मिळताच परिसरातील स्थानिक ग्रामस्थांनी कसलाही विचार न करता तातडीने मदतीसाठी धाव घेतली. दरम्यान, माहिती मिळताच अंभोरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलीस आणि ग्रामस्थांनी युद्धपातळीवर मदतकार्य राबवून बसच्या काचांमधून सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले. या अपघातात किरकोळ जखमी झालेल्या प्रवाशांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर येथील रुग्णालयात पाठवण्यात आले. अपघातानंतर पोलिसांनी तात्काळ पर्यायी बसची व्यवस्था करून प्रवाशांना पुढील प्रवासासाठी रवाना केले आणि रस्ता मोकळा करून वाहतूक सुरळीत केली. या अपघातामुळे कानिफनाथ घाटातील धोकादायक वळणे आणि सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. लांब पल्ल्याच्या खाजगी ट्रॅव्हल्सवर प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि वाहतूक पोलिसांचे नेमके काय नियंत्रण आहे, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. वाहनांची तांत्रिक तपासणी, चालकांवर असणारा कामाचा ताण आणि वेगमर्यादेचे उल्लंघन या गोष्टींकडे परिवहन विभागाने गांभीर्याने पाहण्याची गरज असून भविष्यात असे अपघात रोखण्यासाठी कठोर नियमांची अंमलबजावणी करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

# देवळाई तलावात बुडून तीन अल्पवयीन मित्रांचा दुर्दैवी मृत्यू

## पोहताना पाण्याचा अंदाज न आल्यामुळे सहा पैकी तीन जणांवर काळाचा घाला; सातारा परिसरात पसरली शोककळा

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील देवळाई परिसरातून एक अत्यंत हृदयद्रावक आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. देवळाई परिसरातील गणपती विसर्जन तलावात पोहण्यासाठी गेलेल्या सातारा परिसरातील सहा मित्रांपैकी तीन अल्पवयीन मुलांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. तलावाच्या खोल भागात गेल्यानंतर पाण्याचा आणि खोलीचा योग्य अंदाज न आल्यामुळे हा भीषण अपघात घडला. ही अत्यंत दुर्दैवी घटना सायंकाळी सहा ते साडेसहा वाजेच्या सुमारास उघडकीस आली. या भीषण दुर्घटनेमुळे सातारा आणि देवळाई परिसरात प्रचंड शोककळा पसरली असून अवघ्या पंधरा ते सोळा वर्षे वयोगटातील तीन उमलत्या तरुणांचा असा अंत झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शहरातील सातारा परिसरातील सहा मित्र दुपारी चार ते साडेचार वाजेच्या दरम्यान देवळाई येथील गणपती विसर्जन तलाव परिसरात फिरण्यासाठी आणि पोहण्यासाठी गेले होते. उन्हाळ्याचा थकवा घालवण्यासाठी आणि पोहण्याचा आनंद घेण्यासाठी यातील मुलांनी पाण्यात उड्या घेतल्या. मात्र, पोहताना यातील तीन मुले तलावाच्या अत्यंत खोल भागात गेली. पाण्याचा आणि खोलीचा अंदाज न आल्यामुळे ही तिन्ही मुले पाण्यात गटांगळ्या खाऊ लागली. काठावर असलेल्या इतर मित्रांनी त्यांना वाचवण्यासाठी आणि मदतीसाठी मोठा आरडाओरडा केला, मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता आणि हे तिघेही पाण्याच्या प्रवाहात गडप झाले. सहा जण आनंदाने गेले होते, मात्र त्यातील तीन जण कधीही न परतण्यासाठी निघून गेले.

तलावात बुडून मृत झालेल्या मुलांमध्ये विशाल मच्छिंद्र घुले (रा. बावन घर, सातारा परिसर), आदर्श गौतम इंगोले (रा. बावन घर, सातारा परिसर) आणि यश ज्ञानेश्वर बारबाईले (रा. लक्ष्मी कॉलनी, सातारा परिसर) या तीन मित्रांचा समावेश आहे. एकाच गल्लीतील आणि परिसरातील हे तिन्ही मित्र नेहमी सोबतच खेळायचे आणि सोबतच शाळेत जायचे. या अनपेक्षित अपघातामुळे त्यांच्या पालकांवर जणू आभाळ कोसळले असून संपूर्ण सातारा परिसरात सध्या कमालीची शांतता आणि दुःखाचे वातावरण पसरले आहे.

तलावात मुले बुडाल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि चिकलठाणा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने तात्काळ घटनास्थळाकडे धाव घेतली. स्थानिक पोहणाऱ्यांच्या मदतीने तलावाच्या खोल पाण्यात मोठी शोधमोहीम राबवून तिन्ही मुलांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. चिकलठाणा ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळाचा रीतसर पंचनामा करून तिन्ही मुलांचे मृतदेह तातडीने रुग्णवाहिकेच्या साहाय्याने शासकीय घाटी रुग्णालयात दाखल केले आहेत. या प्रकरणी चिकलठाणा ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# याची देहा याची डोळा अनुभवला शिवछत्रपतींचा राज्याभिषेक सोहळा; क्रांती चौकात ऐतिहासिक उत्साहाची अनुभूती

## कोल्हापूरच्या कलाकारांनी सादर केले शिवकालीन मर्दानी खेळ



**छत्रपती संभाजीनगर :** श्रीमंत, कीर्तिवंत, राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळा दिनानिमित्त शहरातील ऐतिहासिक क्रांती चौकात अभूतपूर्व आणि नयनरम्य सोहळा संपन्न झाला. या संपूर्ण सोहळ्यादरम्यान शिवप्रेमींमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळाला. करवीरनगरी कोल्हापूर येथून आलेल्या चाणक्य मर्दानी खेळ व सांस्कृतिक संघाच्या कलाकारांनी सादर केलेली शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरली. हलगीच्या कडकडत्या तालावर लाठी, दांडपट्टा, पाना, भाला, आणि तलवारबाजीचे थरारक खेळ सादर करत कलाकारांनी उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

शिवराज्याभिषेक सोहळ्याची सुरुवात सकाळी साडेआठ वाजता अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने झाली. सर्वप्रथम ढोल-ताशांच्या गजरात क्रांती चौकातून प्रदक्षिणा घालून छत्रपती शिवरायांची पालखी आणण्यात आली. धर्मरक्षक प्रतिष्ठानच्या वतीने या निमित्ताने शिवरायांचा अत्यंत देखणा आसनस्थ पुतळा आणि आकर्षक देखावा उभारण्यात आला होता. या ठिकाणी पालखी विराजमान केल्यानंतर शिवरायांच्या पुतळ्यास दुग्धाभिषेक घालण्यात आला. त्यानंतर विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक संस्था, संघटनांचे पदाधिकारी आणि

-> पान 2 वर

# जालान नगर परिसरात श्रीमद् भागवत कथा सप्ताहाची भक्तीमय वातावरणात सांगता

## तिरूपती सुप्रीम एन्क्लेव्ह सोसायटीच्या वतीने आयोजन; सात दिवस चाललेल्या ज्ञानयज्ञाचा समारोप









हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील जालान नगर परिसरामध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचा सांगता समारोप अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर अध्यात्मिक रंगात रंगून गेला होता. सात दिवस चाललेल्या या श्रवणभक्तीचा लाभ घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

जालान नगर येथील तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह सोसायटीच्या भव्य आवारात या विशेष भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. कथेच्या दरम्यान विविध धार्मिक आख्यानांचे आणि श्रीकृष्णाच्या लीलांचे सुंदर वर्णन करण्यात आले, ज्याने उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. या सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह सोसायटीचे सर्व सन्माननीय सदस्य आणि त्यांच्या संपूर्ण परिवाराने अहोरात्र परिश्रम घेतले. सर्वांच्या सामूहिक योगदानामुळे आणि नियोजनामुळे हा सोहळा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

सप्ताहाच्या अंतिम दिवशी सांगता समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. या सांगता प्रसंगी विशेष महाआरती आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. परिसरातील नागरिकांनी आणि भाविकांनी या महाप्रसादाचा मोठ्या संख्येने लाभ घेतला. हा सोहळा यशस्वीरित्या संपन्न झाल्याबद्दल सर्व स्तरांतून सोसायटीच्या सदस्यांचे कौतुक केले जात आहे आणि या भक्तिमय वातावरणामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संपादकीय

## कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला देशभरातून प्रचंड पाठिंबा; तरुणांच्या संतापामुळे मोदी सरकार बॅकफूटवर

देशातील शिक्षण व्यवस्थेला लागलेली पेपर लीकची कीड आणि त्यामुळे त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर शनिवारी एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक आंदोलन संपन्न झाले. 'कॉकरोच जनता पार्टी' या नवीन संघटनेच्या वतीने आयोजित या आंदोलनात हजारो संतप्त युवक आणि युवतींनी सहभाग नोंदवला होता. अमेरिकेतून थेट दिल्ली विमानतळावर दाखल झालेले या संघटनेचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी थेट जंतर-मंतर गाठून आंदोलनाचे नेतृत्व केले. वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील गोंधळ आणि पेपर लीकच्या त्रासाला कंटाळून अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा गंभीर आरोप करत, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा तातडीने राजीनामा द्यावा, अशी मुख्य मागणी या आंदोलनादरम्यान करण्यात आली. तसेच केंद्र सरकारला शिक्षणमंत्र्यांची हकालपट्टी करण्यासाठी सात दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला असून, हा केवळ एक ट्रेलर असल्याचा इशारा संघटनेने दिला आहे. या आंदोलनाची सुरुवात एका ऑनलाइन उपरोधिक चळवळीतून झाली होती. देशाच्या सरन्यायाधीशांनी एका खटल्यादरम्यान काही बोगस पदवीधारक तरुणांची तुलना 'कॉकरोच' म्हणजेच झुरळांशी केली होती. या वक्तव्याचा निषेध म्हणून सुरू झालेल्या या चळवळीला सोशल मीडियावर लाखो लोकांचा पाठिंबा मिळाला. जंतर-मंतरवर जमा झालेल्या हजारो समर्थकांना संबोधित करताना अभिजीत दीपके म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून तरुणांना केवळ राजकारणात अडकवून ठेवण्यात आले, परंतु यामुळे कोणालाही नोकऱ्या मिळाल्या नाहीत. आज देशातील प्रत्येक सुशिक्षित तरुणाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात असून, प्रत्येक आईला आपला मुलगा सरकारच्या विरोधात बोलल्यास त्याला तुरुंगात टाकले जाईल अशी भीती वाटत आहे. आता ही भीती झुगारून देण्याची वेळ आली असून, हा लढा देशातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या भविष्यासाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या ऐतिहासिक आंदोलनाला देशातील अनेक प्रमुख विरोधी पक्षांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी उघड पाठिंबा दिला आहे. पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी स्वतः या आंदोलनात सहभागी होत तरुणांच्या भूमिकेचे समर्थन केले. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी सोशल मीडियावर या क्रांतीचे स्वागत केले, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारला इशारा दिला की, स्वतःला देशाचे भाग्यविधाते समजणारे तरुण आज चिलचिलात्या उन्हात रस्त्यावर उतरले आहेत, त्यामुळे या शक्तीला कोणीही कमी लेखण्याची चूक करू नये. आम आदमी पार्टीचे नेते अरविंद केजरीवाल यांनी देखील आंदोलकांवर देशविरोधी असल्याचा शिक्का मारण्याऐवजी पंतप्रधानांनी तात्काळ शिक्षणमंत्र्यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी केली आहे. तृणमूल काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांनीही या आंदोलनाचे स्वागत करत याला सरकारसाठी एक मोठी चेतावणी म्हटले आहे. अनेक ज्येष्ठ राजकीय विश्लेषकांच्या मते, हे आंदोलन अशा वेळी झाले आहे जेव्हा केंद्र सरकारचा सुरुवातीचा काळ संपत आला असून देशातील आर्थिक परिस्थिती आणि बेरोजगारीमुळे तरुणांमध्ये प्रचंड असंतोष आहे. एरवी आंदोलने दडपून टाकणारी दिल्ली पोलीस आणि केंद्र सरकार या आंदोलनाला इतक्या सहजतेने कशी परवानगी देते, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. सरकार जागतिक पातळीवरील विद्यार्थ्यांचे आंदोलन पाहून आधीच सावध झाले असून, तरुणांचा हा राग शांत करण्यासाठी त्यांनी ही परवानगी दिली असावी, असा अंदाज वर्तवला जात आहे. जेएनयूच्या आंदोलनापेक्षा हे आंदोलन अधिक व्यापक आहे कारण याचा संबंध देशातील प्रत्येक घरातील मुलांच्या शिक्षणाशी आणि भविष्याशी जोडलेला आहे. ही संघटना भविष्यात राजकीय पक्ष म्हणून उभी राहते की नाही हे पाहणे महत्त्वाचे ठरेल, परंतु सध्या तरी त्यांनी सरकारला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडले आहे.

## बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा निवडणुकीत ॲड साळुंके विजयी

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा सदस्य निवडणुकीत ॲड वसंतराव दिगंबरराव साळुंके यांनी सलग पाचव्यांदा विजयी होण्याचा विक्रम नोंदविला आहे. सलग पाच वेळा विजयी होणारे परिषदेचे ते पहिले आणि एकमेव सदस्य आहेत.

महाराष्ट्र गोवा विधी परिषदेच्या २५ जागांसाठी २४ मार्च रोजी झालेल्या निवडणुकीचा निकाल शनिवारी (दि.सहा) घोषित करण्यात आला. या निवडणुकीत एकूण ९२ हजार ५१ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. यातील ८८ हजार ३५७ मते वैध तर ३ हजार ६९४ मते अवैध ठरली. यातून ॲड वसंतराव साळुंके यांना पहिल्या पसंतीची एक हजार ८१२ मते पडली. ४ जून रोजी पहिल्या पसंतीच्या मतांची यादी घोषित झाली. तर अंतिम निकाल शनिवारी घोषित करण्यात आला. यामध्ये त्यांना पसंती क्रमानुसार मिळालेल्या अंतिम मतांचे मूल्य ३ लाख ६९ हजार ३३० आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात ज्येष्ठ विधीज्ञ ॲड वसंतराव दिगंबरराव साळुंके हे १९८२ पासून म्हणजेच स्थापनेपासून कार्यरत आहेत. तर बार कौन्सिलवर १९९८ पासून सलग निवडून येत आहेत. २०२२_२३ या वर्षात परिषदेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी असलेले ॲड वसंतराव साळुंके हे बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील सादोळा येथील रहिवासी आहेत. तर त्यांचे ज्येष्ठ बंधू मोहनराव साळुंके माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आहेत. तर ॲड मयूर वसंतराव साळुंके व ॲड सुदर्शन जीवनराव साळुंके हे त्यांचा वारसा नेटाने पुढे नेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दूडशेहून अधिक विधीज्ञ तयार झाले आहेत. जिल्हा न्यायाधीश तसेच जेएमएफसी, विधी अधिकारी या पदावरही अनेक जेण पोहचले आहेत. सदस्य पदी निवडून आल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदन वर्षाव होत आहे.

# इंधनाचा काळाबाजार रोखण्यासाठी राज्य सरकार ॲक्शन मोडवर

**मुंबई :** इराण-अमेरिका युद्धामुळे जागतिक इंधन पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून, त्याचा परिणाम देशातील पेट्रोलियम उत्पादनांच्या पुरवठ्यावर झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील पेट्रोल आणि डिझेलचा काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी राज्य सरकार 'ॲक्शन मोड'वर आले आहे. घाऊक (बल्क) औद्योगिक ग्राहकांकडून किरकोळ विक्री केंद्रांवरून (पेट्रोल पंप) होणाऱ्या इंधन खरेदीमुळे सर्वसामान्यांच्या कोट्यातील पुरवठ्यावर प्रचंड ताण येत असल्याचे समोर आले आहे. या साठेबाजीला आणि गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने संपूर्ण राज्यात विशेष तपासणी मोहीम राबवण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये दोषी आढळणाऱ्या संस्था आणि पेट्रोल पंप चालकांवर जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले जाणार आहेत.

इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर, घाऊक औद्योगिक ग्राहकांसाठीचे इंधनाचे दर हे सामान्य ग्राहकांसाठी असलेल्या किरकोळ (रिटेल) दरांपेक्षा अधिक झाले आहेत. याच किंमतींमधील फरकाचा फायदा उठवण्यासाठी अनेक जिल्ह्यांमध्ये मोठे औद्योगिक व व्यावसायिक ग्राहक थेट कंपन्यांकडून इंधन न घेता, किरकोळ पेट्रोल पंपांवरून बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणावर डिझेल खरेदी करत असल्याचे निदर्शनास आले आहे. राज्यस्तरीय तेल उद्योग समन्वयकांच्या आकडेवारीनुसार, मे २०२६ च्या पहिल्या तीन आठवड्यांत मागील वर्षीच्या तुलनेत पेट्रोलच्या मागणीत १८.५४ टक्के तर डिझेलच्या मागणीत तब्बल २२.३ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली आहे, तर दुसरीकडे अधिकृत बल्क डिझेलच्या विक्रीत मोठी घट झाली आहे.'

इंधन चोरीला आणि अनधिकृत खरेदी-विक्रीला चाप लावण्यासाठी राज्य सरकारने सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना विशेष अधिकार दिले आहेत. व्यावसायिक आणि औद्योगिक संस्थांना केवळ तेल कंपन्यांच्या 'डायरेक्ट सेल्स' किंवा 'बल्क सप्लाय' यंत्रणेमार्फतच इंधन खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियम डावलून जर कोणताही घाऊक ग्राहक किरकोळ पेट्रोल पंपावरून इंधन घेताना आढळला, तर संबंधित औद्योगिक संस्था आणि पेट्रोल पंप चालक या दोघांवरही कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. याशिवाय, वैध पावत्या, डिलिव्हरी चलन आणि सुरक्षा प्रमाणपत्रांशिवाय पेट्रोलियम पदार्थांची वाहतूक करणारे अनधिकृत टँकर्स जप्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

'डिजिटल' देखरेख ठेवणार

सर्व जिल्हा प्रशासनांना आपापल्या अधिकार क्षेत्रातील पेट्रोल पंपांच्या दैनंदिन विक्रीवर 'डिजिटल' देखरेख ठेवण्यास सांगण्यात आले आहे. ज्या पंपांवर अचानक असामान्य विक्री वाढेल, तिथे तात्काळ धाडी टाकल्या जातील. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यकतेनुसार पंपांवर रांगेचे नियमन आणि गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी पोलीस बंदोबस्त पुरवला जाणार आहे. मोहिमेत पारदर्शकता राखण्यासाठी, प्रशासनामार्फत दररोज झालेल्या कारवाईचा सविस्तर तपशील रोज संध्याकाळी ६ वाजेपर्यंत एका विशेष 'गुगल शीट'वर अद्ययावत करणे सरकारी अधिकाऱ्यांना बंधनकारक करण्यात आले आहे.

शेतकरी, रुग्णालये आणि मच्छिमारांना दिलासा

प्रशासनाने ही मोहीम राबवताना सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि अत्यावश्यक सेवांना कोणताही त्रास होणार नाही, याची पूर्ण काळजी घेण्याची सूचना केली आहे. कृषी कार्यासाठी लागणारे डिझेल तसेच रुग्णालयांचा इंधन पुरवठा प्रत्यक्ष गरजेनुसार आणि योग्य पडताळणी करून कोणत्याही अडथळ्याविना सुरळीत सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, मच्छिमार सहकारी संस्था व मत्स्यव्यवसाय विकास विभागाकडे नोंदणीकृत असलेल्या नौकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार नियमित डिझेलचा पुरवठा केला जाणार आहे.

# महागाई, इंधन दरवाढ व फसवी कर्जमाफीविरोधात शिवसेनेचे आज शहरात जनआक्रोश आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर :** इंधन दरवाढ, वाढलेली महागाई आणि शेतकऱ्यांच्या फसव्या कर्जमाफीच्या विरोधात शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने "महंगाई के अच्छे दिन" जनआक्रोश आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. हे आंदोलन रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता क्रांती चौक येथे होणार आहे.

शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्या संयोजकतेखाली हे आंदोलन पार पडणार असून शिवसेना नेते चंद्रकांत खैरे व शिवसेना उपनेते सुभाष पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

शिवसेना पदाधिकारी, सर्व अंगीकृत संघटना पदाधिकारी व नागरिकांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेना सहसंपर्कप्रमुख अनिल चोरडिया, राजेंद्र काळे, विजयराव साळवे, सुनील शिंदे, उपजिल्हाप्रमुख संतोष जेजुरकर, राजू इंगळे, संतोष खेंडके, लक्ष्मीनारायण बाखरिया, किशोर कच्छवाह, बबन तात्या जाधव, रमेश सावंत, अविनाश पाटील, अंकुश सुंब, संजय पिंपळे, अरविंद धिवर, अशोक शिंदे, जगन्नाथ पवार, विठ्ठल बदर, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, हरिभाऊ हिवाळे, ज्ञानेश्वर डांगे, दिग्विजय शेरखाने, तालुकाप्रमुख मनाजी पाटील मिसाळ, संजय मोटे, सुभाष कानडे, दिनेश मुथा, राजू वरकड, विष्णू जाधव, दिलीप मचे, सोमीनाथ करपे, रघुनाथ घरमोडे, आनंद भालेकर, मनोज पेरे, विधानसभा प्रमुख प्रमोद ठेंगडे, तालुका संघटक मनोज गायके, विधानसभा संघटक डॉ. अण्णासाहेब शिंदे, गोपाल कुलकर्णी, गिरीश चपळगावकर, वीरभद्र गादगे, गणेश अधाने, जिल्हा परिषद सदस्य संजय निकम, सुगंदा चव्हाण, केतन काजे, सुनीता चव्हाण, ललिता सोनवणे, विद्या गायकवाड, महिला आघाडी संपर्कसंघटक सुनिता आऊलवार, सह संपर्क संघटक सुनीता देव, अनिता मंत्री, जिल्हा संघटक आशा दातार, राखी परदेशी, सुकन्या भोसले, मीना फसाटे, शहरसंघटक सुनीता सोनवणे, भागूआक्का शिरसाठ, अरुणा भाटी, नलेनी बाहेती, सुनंदा खरात, मीरा देशपांडे, रेणुका जोशी, युवासेना उपसचिव ऋषिकेश खैरे, धर्मराज दानवे, जिल्हा युवा अधिकारी विठ्ठल डमाळे, उमेश मोकासे व हनुमान शिंदे यांनी केले आहे.

# दक्षिण मध्य रेल्वेची अभूतपूर्व कामगिरी फुकट्या प्रवाशाकडून मिळाला दीड कोटी चा दंड वसूल

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने मे महिन्यात अबूतपूर्व यश एका महिन्यात रेल्वेला मिळाला दीड कोटी रुपये महसूल.

रेल्वेच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे नियोजन आणि त्यांचे कर्तव्य बजावणारे तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या समर्पित प्रयत्नामुळे विभागाने रेल्वे महसूल संरक्षण प्रवासी शिस्त आणि सेवा गुणवत्तेच्या क्षेत्रात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. मे महिन्यात विभागातील विविध रेल्वे गाड्या व स्थानकांवर व्यापक तिकीट तपासणी करण्यात आली. या सातत्यपूर्ण तपासणी मोहिमांमुळे एकूण 28 हजार 944 विनातिकीट व अनियमित प्रवासाची प्रकरणे आढळून आली. त्यातून.1. कोटी 72 लाख 85. हजार 460 रुपये इतका विक्रमी महसूल रेल्वेला प्राप्त झाला. नांदेड विभागाच्या इतिहासात एका महिन्यात तिकीट तपासणी द्वारे मिळालेला हा सर्वाधिक महसूल असून विभागाच्या महसूल संरक्षण उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीचे हे घोतक आहे. प्रवाशांमध्ये अधिक जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच प्रवास नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी विभागात विशेष तिकीट तपासणी मोहिमांचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये.

तीन भव्य तिकीट तपासणी मोहिमा एक मॅजेस्टेड विशेष तपासणी मोहीम...

18.फोर्ट्रेस तपासणी मोहीम या व्यापक तिकीट तपासणी व अंमलबजावणी मोहिमांच्या यशामध्ये 33 तिकीट तपासणी पथक कर्मचारी 174 अमेनिटी कर्मचारी आणि.18. स्टेशनरी कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच या मोहिमा रेल्वे सुरक्षा बल यांच्या समन्वयाने प्रभावीपणे राबविण्यात आल्या. महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांवर आणि प्रमुख रेल्वे गाड्यांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या विशेष मोहिमामुळे विना तिकीट व अनियमित प्रवासाच्या प्रकरणांचा शोध घेणे. महसूल गळती रोखणे आणि अनधिकृत प्रवासाला आळा घालणे अधिक प्रभावीपणे शक्य झाले तिकीट तपासणी मोहिमांचा उद्देश केवळ महसूलवाढ नसून वैद्य तिकीट खरेदी करून प्रवास करणाऱ्या प्रामाणिक प्रवाशांना सुरक्षित आरामदायी आणि विनाअडथळा प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणे हा त्यामागील प्रमुख हेतू. आहे विनातिकीट प्रवास. आरक्षित डब्यांमधील अनधिकृत प्रवास आणि इतर प्रवासातील अनियमितता रोखल्यामुळे डब्यामधील गर्दी कमी होण्यास मदत होते. तसेच प्रवाशांची सुरक्षा वाढते. प्रवासातील शिस्त कायम राहते. आणि एकूणच प्रवासाचा दर्जा सुधारतो या मोहिमेमुळे रेल्वेच्या सुविधांचा योग्य व न्याय लाभ खऱ्या प्रवाशांना मिळण्यास मदत होते.

नांदेड विभाग रेल्वे महसुलांचे संरक्षण प्रवासातील शिस्तीचे पालन आणि प्रवासी सेवांमध्ये सातत्याने सुधारणा करण्यासाठी कटीबद्ध आहे. सर्व रेल्वे प्रवाशांनी वैद्य तिकिटासह प्रवास करावा तसेच सुरक्षित शिस्तबद्ध आणि प्रवासीहितैषी रेल्वे व्यवस्था राखण्यासाठी रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे...

# जागतिक पर्यावरण दिनी आरोग्य विभागाचा हरित संदेश; वृक्षारोपणातून जनजागृती

## 'निरोगी पर्यावरण हेच निरोगी जीवनाचे आधारस्थान'; जिल्हाभर विविध उपक्रमांना प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमध्ये वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम व जनजागृती उपक्रम उत्साहात राबविण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि आरोग्य संरक्षणाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला.



अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नागेश सावरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. पर्यावरण आणि आरोग्य यांचा अतूट संबंध अधोरेखित करत 'माझं गाव – आरोग्य व पर्यावरण संपन्न गाव' या संकल्पनेला यंदा विशेष प्राधान्य देण्यात आले.

उपकेंद्र कुंभेफळ, पिसादेवी आणि हिवरा येथे वृक्षारोपण करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र वरुडकाजी येथे नवीन इमारतीसमोर वडाच्या झाडाची लागवड करण्यात आली. दौलताबाद प्राथमिक आरोग्य केंद्रात पर्यावरणाचे महत्त्व, वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि स्वच्छतेची गरज याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तर उपकेंद्र वडगाव कोल्हाटी येथे स्वच्छता मोहीम राबवून कचरा संकलन करण्यात आले. पिंपरी राजा प्राथमिक आरोग्य केंद्रातही वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. या मोहिमेत वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घेतला. "निरोगी पर्यावरण हीच निरोगी समाजाची गुरुकिल्ली आहे. वृक्षारोपण, स्वच्छता आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे," असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले.

# परभणीत गुन्हेगारीचे सत्र थांबेना पोलिसांपुढे आव्हान

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी



**परभणी :** शहरात घर फोड्या आणि चोऱ्यांच्या घटनांनी धुमाकूळ घातला आहे. एका मागून एक घडणाऱ्या या गुन्हांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये कमालीची दहशत निर्माण झाली असून पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे पोलिसांची गस्त आणि सुरक्षा व्यवस्था केवळ एक औपचारिकता उरली आहे का?. असा संतप्त सवाल आता नागरिकांतून विचारला जात आहे.

नुकतीच सहकार नगर भागातील रहिवासी कपिल देशमुख यांच्या बंद घराला गोल्डन लक्ष केले. चोरट्याने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि मोठा एवज लंपास केला. या घटनेप्रकरणी देशमुख यांनी पोलिसांत रितसर तक्रार दाखल केली असून. त्यानंतर प्रशासनाला स्मरणपत्रही देण्यात आले आहे. मात्र अद्याप पोलिसांच्या हाती ठोस काहीही लागलेले नाही. या घटनेव्यतिरिक्त शहरातील इतर दोन ते तीन ठिकाणी अशाच प्रकारे घरफोड्या झाल्याची माहिती समोर आली आहे. चोरटे राजरोसपणे बंद घरे शोधून डल्ला मारत असल्याने पोलीस गस्तीचा कोणताही धाक गुन्हेगारांवर उरलेला नसल्याचे दिसत आहे.

**पोलिसांपुढे मोठे आव्हान :** एकाच भागात लागोपाठ होणाऱ्या या चोऱ्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर चोरट्यांनी मोठे आव्हान निर्माण केले आहे. वाढत्या गुन्हेगारीमुळे नागरिक स्वतःला असुरक्षित समजत असून पोलिसांनी केवळ कागदोपत्री कारवाई न करता रात्रीची गस्त वाढवावी आणि या टोळीचा पर्दाफाश करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# वनामकृवीत जागतिक पर्यावरण दिनानिमित्य वृक्ष लागवड अभियानाची सुरुवात

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून याही वर्षी अधिकृत थीम निसर्गातून प्रेरित हवामानासाठी आपल्या पर्यावरणचे संतुलन राखण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या सेंद्रिय व नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या साहेब आपला येथे वृक्ष लागवड अभियानाचा शुभारंभ दिनांक 5 जून 2026 रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू प्रा. डॉ. इंद्रा मणीहे होते.

प्रमुख पाहुणे म्हणून परभणी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक पंकज कुमावत हे उपस्थित होते तर विशेष अतिकी म्हणून माननीय विभागीय वन अधिकारी श्रीमती सायमा पठाण या आवर्जून या कार्यक्रमाचे उपस्थित होत्या यावेळी मान्यवराच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला कार्यक्रमास विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉक्टर भगवान असेवार संशोधन संचालक डॉ. खिजर बेग विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे माजी शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके सहयोगी अधिष्ठाता विश्वनाथ खंदारे विभाग प्रमुख डॉ. हिराकांत काळ पांड प्रमुख अन्वेषक डॉ.आनंद गोरे शास्त्रज्ञ डॉ मीनाक्षी पाटील डॉक्टर प्रणिता गोरखेडे डॉ. Sharda श्रद्धाधुरागुडे तसेच वनविभागाचे अधिकारी श्री गजापुरे श्रीमती निलोफर पठाण श्रीमती चंद्र मोरे श्रीमती गोरे आधीची उपस्थिती होती कार्यक्रम यशस्वीतेसाठी कृषी विद्यापीठाचे कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या हकालपट्टीसाठी सरकारला सात दिवसांचा अल्टिमेटम...

पान 1 वरून ->

तृणमूल काँग्रेसच्या राज्यसभा उपनेत्या सागरिका घोष यांनी सांगितले की, दरवर्षी होणाऱ्या पेपर लीकमुळे त्रस्त झालेल्या तरुणांचा हा आक्रोश असून सरकारने आतातरी जागे व्हावे. राष्ट्रीय जनता दलाचे प्रवक्ते मृत्युंजय तिवारी यांनी लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार असल्याचे सांगत या आंदोलनाचे समर्थन केले आहे. तसेच समाजवादी पक्षाचे खासदार राजीव राय यांनी या आंदोलनाला सरकारसाठी एक गंभीर चेतावणी म्हटले असून, याची तुलना सत्तरच्या दशकातील जेपी आंदोलनाशी केली आहे. कम्युनिस्ट पक्षाच्या विविध नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी थेट जंतर-मंतरवर जाऊन या आंदोलनात सहभाग घेतला आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

# सराफ दरोडा प्रकरणातील संशयित आरोपीचा सोलापूर पोलिसांवर गोळीबार; आरोपी फरार

पान 1 वरून ->

४ जून रोजी रात्री सुमारे १०.३० वाजता आरोपी आपल्या घरासमोर काही साथीदारांसह पाइपलाइनचे काम करत असल्याचे पोलिसांना दिसून आले. पोलिसांनी सापळा रचून आरोपीला शरण येण्याचे आवाहन केले. मात्र आरोपी पावलस गायकवाड याने पोलिसांचे आदेश धुडकावून त्याने थेट पोलीस पथकाच्या दिशेने गोळीबार केला. ही गोळी पो. कॉ. बटुळे यांच्या अगदी जवळून गेल्याने मोठी दुर्घटना टळली.त्यानंतर पोलिसांनी आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता त्याने घरासमोर उभी असलेली पांढऱ्या रंगाची एक्सयूव्ही कार घेतली आणि आपल्या साथीदारांसह भरधाव वेगाने बीडच्या दिशेने पलायन केले. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, पोलिस निरीक्षक विलास पुजारी हे आपल्या पोलीस पथकांसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथकांना सूचना दिल्या. या प्रकरणी सपोनि. विजय शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पावलस उर्फ मेहेर कचरू गायकवाड व त्याच्या दोन ते तीन अनोळखी साथीदारांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका संशयित ला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# याची देहा याची डोळा अनुभवला ...

पान 1 वरून ->

हजारो शिवप्रेमींनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. "जय भवानी, जय शिवाजी" अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण क्रांती चौक परिसर दणाणून निघाला होता.

या सोहळ्याचे औचित्य साधून चौकाच्या दुसऱ्या बाजूला जालनाकर ग्रुप, मोरे परिवार आणि जय शिवाजी राजे मित्र मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक शिवप्रेमींनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून छत्रपती शिवरायांना आगळीवेगळी मानवंदना दिली. संपूर्ण क्रांती चौक परिसर भगव्या पताकांनी आणि ध्वजांनी उजळून निघाला होता, ज्यामुळे वातावरणात एक वेगळेच चैतन्य निर्माण झाले होते. या सोहळ्याला महिला, युवक आणि युवतींची उपस्थिती लक्षणीय होती.

या ऐतिहासिक सोहळ्याला शहरातील आणि जिल्ह्यातील अनेक प्रमुख मान्यवरांनी हजेरी लावली. यामध्ये पालकमंत्री संजय शिरसाट, खासदार डॉक्टर कल्याण काळे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार अंबादास दानवे, महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, महापालिका आयुक्त अमोल येडगे, पृथ्वीराजभाऊ पवार, बाळासाहेब थोरात, राजेंद्र दाते पाटील, किशोर चव्हाण, सुरेश वाकडे, सचिन खैरे, संतोष जेजूरकर, संदीप शेळके, इब्राहिम खान पठाण आणि उदय डोंगरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश होता. सोहळ्यादरम्यान आमदार अंबादास दानवे यांनी स्वतः हातात दांडपट्टा आणि तलवार घेऊन प्रात्यक्षिके सादर केल्याने शिवप्रेमींचा उत्साह अधिकच वाढला.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# बीड पोलिसांची खाकी डागाळली; शेतकऱ्याच्या मुलाला धमकी देणारा लाचखोर पोलीस अंमलदार बळवंत अखेर जाळ्यात

### अपघात विम्याच्या कागदपत्रांसाठी दहा हजारांची लाच घेताना जालना एसीबीची नेकनूर पोलीस ठाण्यात धडक कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**बीड :** नेकनूर पोलीस ठाण्याच्या कार्यकाळात पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करत न्याय मागणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलाला "कॅरेक्टर खराब करून टाकेल बेट्या" अशी उघड धमकी देणारा पोलीस अंमलदार दत्तात्रय बळवंत अखेर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला आहे. एका अपघातग्रस्त मयताच्या विमा मंजुरीच्या कागदपत्रांसाठी दहा हजार रुपयांची लाच स्वीकारताना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) त्याला रंगेहात अटक केली. या धडक कारवाईमुळे बीड आणि जालना पोलीस दलात प्रचंड खळबळ उडाली असून, तत्कालीन पोलीस अधीक्षकांच्या भूमिकेवर आता गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

याबाबत मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, नेकनूर पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार चंद्रकांत गोसावी यांच्या कार्यकाळात पोलीस यंत्रणा जनतेऐवजी पवनचक्की आणि सौर कंपन्यांसाठी काम करत असल्याचे चित्र होते. अवैध धंद्यांसोबतच कंपन्यांना लुटण्यासाठी मोकळे रान मिळाले होते. या विरोधात प्रसिद्धी माध्यमांनी आवाज उठवला होता. याच दरम्यान कानडी घाट येथे विद्युत टॉवर उभारणी करताना आपला हक्काचा मावेजा मागणाऱ्या एका निष्पाप शेतकऱ्याच्या मुलाला "अय शहाणपणा करू नको, सातबारा दाखव नाहीतर कॅरेक्टर खराब करून टाकेल बेट्या!" अशी अत्यंत उद्धटपणे धमकी देतानाचा पोलीस कॉन्स्टेबल दत्तात्रय बळवंत याचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला होता. त्यावेळी कर्तव्यदक्ष म्हणवणारे तत्कालीन पोलीस




अधीक्षक नवनीत कावत आणि ठाणेदारांनी बळवंतवर कारवाई करण्याऐवजी त्याची पाठराखण केली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या या अप्रत्यक्ष पाठिंब्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकरी मुकाट्याने अन्याय सहन करत गेले.

मात्र, ज्या बळवंतची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाठराखण केली, त्याचे स्वतःचे 'कॅरेक्टर' किती खराब आहे हे या ताज्या कारवाईने उघड केले आहे. येळंब येथील एका व्यक्तीचा काही दिवसांपूर्वी भीषण अपघात झाला होता आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. मयताच्या मुलाने वडिलांच्या अपघात विम्याचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या शासकीय कागदपत्रांची मागणी अंमलदार दत्तात्रय बळवंत याच्याकडे केली होती. दुःखात असलेल्या कुटुंबाला मदत करण्याऐवजी बळवंत याने ती कागदपत्रे देण्याच्या मोबदल्यात दहा हजार रुपयांच्या लाचेची थेट मागणी केली. तक्रारदाराने या जुलुमाविरोधात थेट जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार नोंदवली.

जालना एसीबीच्या पथकाने प्रकरणाची गुप्तपणे शहानिशा केली असता लाचेची मागणी सिद्ध झाली. त्यानुसार शनिवारी दुपारी नेकनूर पोलीस ठाण्याच्या परिसरातच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अत्यंत नेटका सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून दहा हजार रुपयांची लाच स्वीकारताना अंमलदार दत्तात्रय बळवंत याला रंगेहात पकडण्यात आले. ही यशस्वी कारवाई जालना एसीबीचे उपाधीक्षक बाळासाहेब जाधवर यांच्या सक्षम मार्गदर्शनाखालील पथकाने केली असून, आरोपी बळवंत विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर प्रक्रिया वेगाने सुरू आहे.

या धडक कारवाईनंतर नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतील जनतेतून आणि शेतकरी वर्गातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. शेतकऱ्याच्या मुलाला धमकी दिली होती त्याच वेळी जर तत्कालीन पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी बळवंतवर कडक कायदेशीर कारवाई केली असती, तर आज लाच घेताना पकडले जाऊन बीड पोलिसांची खाकी अशी डागाळली नसती, असा संतप्त सूर आता नागरिकांमधून उमटत आहे.

## महागामी गुरुकुलतर्फे 'पदार्पण' नृत्य कार्यशाळेचे आयोजन

### कथक व उडीसी नृत्यकलेचा परिचय आणि प्रारंभिक प्रशिक्षणाची संधी



हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय शास्त्रीय नृत्यपरंपरेचा परिचय करून देण्यासाठी महागामी गुरुकुलतर्फे २० व २१ जून २०२६ रोजी 'पदार्पण' या दोन दिवसीय कथक व उडीसी नृत्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत महागामी गुरुकुल येथे होणार आहे.

भारतीय नृत्यवारशाचा अभ्यास, कथक व उडीसी नृत्यकलांची परंपरा, त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण सौंदर्य आणि प्रारंभिक प्रशिक्षण यांचा परिचय या कार्यशाळेत सहभागींना करून दिला जाणार आहे. कथक व उडीसी नृत्यकलेविषयी जाणून घेण्याची उत्सुकता असलेल्या जिज्ञासू, नृत्यप्रेमी तसेच नृत्य शिकण्याची इच्छा असलेल्या साधकांसाठी ही कार्यशाळा विशेष संधी ठरणार आहे.

गुरु-शिष्य परंपरेवर आधारित नृत्यशिक्षणाची ओळख करून देतानाच सहभागींच्या कलात्मक क्षमतांचे मूल्यांकन व आवश्यक मार्गदर्शनही या कार्यशाळेत केले जाणार आहे. त्यामुळे नृत्यकलेच्या क्षेत्रात वाटचाल करू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कार्यशाळेत प्रवेशासाठी इच्छुकांनी महागामी गुरुकुल कार्यालयाशी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४०-६४८१०७० किंवा मोबाईल क्रमांक ९३७२०९३१८९ वर संपर्क साधता येईल.

## फर्दापूर पोलिसांची अवैध धंद्यांवर धडक कारवाई

**फर्दापूर :** फर्दापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील विविध गावांमध्ये सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी विशेष धाडीचे सत्र राबवून कारवाई केली. या कारवाईत अवैधरित्या हातभट्टी दारूचे उत्पादन व विक्री करणाऱ्या पाच जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच, विनापरवाना कल्याण मटका जुगार चालविणाऱ्या एका व्यक्तीवरही गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान एकूण ४४ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या नाशवंत मुद्देमालाचा पंचांसमक्ष नाश करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. फर्दापूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक सुधीर मोटे तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने या धाडसत्रात सक्रिय सहभाग घेत अवैध व्यवसायांवर कारवाई केली. परिसरातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून कठोर पावले उचलली जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## KCET UGCET निकाल 2026 जाहीर : यंदाच्या निकालात विद्यार्थिनींचा डंका; मुलांपेक्षा तब्बल 41 हजार अधिक मुलींची परीक्षेला उपस्थिती

बंगळुरू : कर्नाटक परीक्षा प्राधिकरणाकडून (KEA) घेण्यात आलेल्या बहुचर्चित 'कर्नाटक सामायिक प्रवेश परीक्षेचा' (KCET UGCET 2026) निकाल अखेर अधिकृतपणे जाहीर करण्यात आला आहे. उच्च शिक्षण आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही अत्यंत महत्त्वाची परीक्षा मानली जाते. ज्या विद्यार्थ्यांनी यंदा ही परीक्षा दिली होती, ते आता आपले गुणपत्रक (Scorecard) KEA च्या अधिकृत वेबसाईटवर जाऊन ऑनलाईन पाहू शकतात. या वर्षीच्या निकालाचे आणि परीक्षेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे मुलींनी नोंदवलेला अभूतपूर्व सहभाग. यंदाच्या परीक्षेत मुलांपेक्षा तब्बल ४१ हजारांहून अधिक विद्यार्थिनींनी परीक्षा देत एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. यंदाच्या प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. प्राधिकरणाने जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, संपूर्ण राज्यभरातून तब्बल ३ लाख ३० हजार ६४६ विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. यापैकी जवळपास सर्वच, म्हणजे ३ लाख ३० हजार ४७९ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर जाऊन परीक्षा दिली. या परीक्षेतील उपस्थितीचे प्रमाण अत्यंत समाधानकारक असून, केवळ भौतिकशास्त्र (Physics) या एका विषयाचा पेपर सोडवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ३ लाख ०९ हजार ०१४ इतकी होती, यावरून विद्यार्थ्यांचा या परीक्षेतील गांभीर्याचा अंदाज येतो.

## अहिल्यानगरच्या जीएसटी कार्यालयात 4 कोटीचा अपहार उघड

### शासकीय अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

**अहिल्यानगर :** येथील राज्य वस्तू व सेवाकर (जीएसटी) विभागामध्ये अपहाराची मोठी घटना घडल्याचे उघडकीस आले असून शासनाची तब्बल ३ कोटी ८७ लाख ११ हजार ८५९ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी एका शासकीय अधिकाऱ्यावर भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी वस्तू व सेवाकर विभागाचे अधिकारी हेमंत लक्ष्मण गांगे यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून संशयित आरोपी प्रकाश लक्ष्मण चव्हाण (रा. श्रृंगार निवास, गुलमोहर रोड, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध शासकीय रकमेचा अपहार आणि फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

पोलीस दिलेल्या माहितीनुसार, आरोपी प्रकाश चव्हाण हा अहिल्यानगर कार्यालयात कार्यरत असताना, त्याने आपल्या पदाचा गैरवापर केला. कार्यालयाचे कोणतेही रेकॉर्ड व्यवस्थित न ठेवता, संगणक प्रणालीवरील महाविकास सांकेतांचा वापर करून आपल्या अधिकृत युझर आयडी आणि पासवर्डद्वारे मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत तब्बल ४४ चलनांमध्ये व्यापाऱ्यांच्या दुरुस्ती अर्जाशिवाय बेकायदेशीर फेरफार केले. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्याने शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाचा अपहार केला.तसेच एका पेट्रोलियम व्यापाऱ्याने भरलेला १ लाख ३० हजार ५०२ रुपयांचा कर आरोपीने स्वतःचा मुलगा अक्षय चव्हाण याच्या 'नक्ष हॉटेल'च्या खात्यावर परस्पर वर्ग करून शासनाची फसवणूक केली. सदरचा अपहार हा १५ जुलै २०१७ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत करण्यात आला आहे. या प्रकरणी भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## जिल्हा परिषदेत गुढी उभारून उत्साहात शिवराज्य दिन साजरा

### छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य सर्वसमावेशक व व्यापक होते – अध्यक्ष अविनाश गलांडे

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शिवाजी महाराजांनी समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी दूरदृष्टी ठेवून नियोजनबद्ध कार्य केले. त्यांचे कार्य सर्वसमावेशक, लोककल्याणकारी आणि व्यापक स्वरूपाचे होते, असे प्रतिपादन जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी केले.

शिवराज्य दिनानिमित्त जिल्हा परिषद मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष अविनाश गलांडे व उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल यांच्या हस्ते गुढी उभारून शिवराज्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमाला समाजकल्याण सभापती बालाजी सोनटक्के, जिल्हा परिषद सदस्य अर्जुन नितीन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यानंतर शिक्षक प्रशांत देसाई यांनी शिवराज्याभिषेकावर आधारित पोवाडा सादर केला, तर विद्यार्थी संघर्ष काळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित पोवाड्याचे सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची जीवनशैली, प्रशासन व्यवस्था आणि कार्यपद्धती याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) राघवेंद्र घोरपडे, उपलेखा व वित्त अधिकारी माया मांजरमकर (पगारे), शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, कृषी अधिकारी प्रकाश पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालकल्याण) डॉ. मंगल पांचाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) अनुपमा नंदनवनकर, कार्यकारी अभियंता किरण झणके, उपआयुक्त पशुसंवर्धन डॉ. नानासाहेब कदम, उपशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ, सहायक प्रशासन अधिकारी मीना तपकिरे, अजय बोधनकर, दिलीप निकम, चंद्रशेखर करंडे, सुनील पाटील, पराग बिडकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'संकल्प ते सिद्धी' अभियानासाठी भाजपची रणनीती; विभागीय कार्यालयात नियोजन बैठक

### केंद्र सरकारच्या 12 वर्षांच्या विकासकामांची माहिती घराघरात पोहोचविण्यावर भर

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त देशभर राबविण्यात येणाऱ्या 'संकल्प ते सिद्धी' अभियानाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या विभागीय कार्यालयात शनिवारी महत्त्वपूर्ण नियोजन बैठक संपन्न झाली.

या बैठकीत केंद्र सरकारच्या विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, लाभार्थी संपर्क अभियान अधिक व्यापक करणे




तसेच आगामी कार्यक्रमांचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अभियानाच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या विकासकामांची माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीत भाजपा प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, खासदार डॉ. भागवत कराड, मराठवाडा विभाग संयोजक नितीन काळे तसेच भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी उपस्थित नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करत केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ घेतलेल्या नागरिकांशी संपर्क वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले.

'संकल्प ते सिद्धी' अभियान हे केवळ सरकारी योजनांची माहिती देणारे नसून विकासाची गाथा जनतेपर्यंत पोहोचविणारे लोकसंपर्क अभियान ठरणार असल्याचे मत वक्त्यांनी व्यक्त केले. बैठकीस नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धर्मतीर्थावर दोन आचार्यांचे ऐतिहासिक मंगल मिलन

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** धर्मतीर्थ क्षेत्रावर शुक्रवारी अध्यात्म, श्रद्धा आणि भक्तिभावाने ओतप्रोत भरलेला ऐतिहासिक सोहळा पार पडला. क्रांतिकारी राष्ट्रसंत आचार्य श्री गुप्तिनंदीजी गुरुदेव ससंघ आणि आगम-सिद्धांताचे प्रकांड विद्वान आचार्य श्री सिद्धांतसागरजी महाराज यांच्या मंगल मिलनाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

आचार्य श्री सिद्धांतसागरजी महाराज धर्मतीर्थावर आगमन होताच आचार्य श्री गुप्तिनंदीजी गुरुदेव ससंघ यांनी आगमोक्त परंपरेनुसार त्यांचे भव्य स्वागत व अभिनंदन केले. यावेळी संपूर्ण संघाने नमोस्तु-प्रतिनमोस्तु करीत तीन प्रदक्षिणा घालून आचार्यश्रींप्रती श्रद्धा व्यक्त केली. आचार्य सिद्धांतसागरजी महाराजांनीही आचार्य गुप्तिनंदीजी गुरुदेवांना आत्मीयतेने आलिंगन देत परस्पर स्नेह, आदर आणि वात्सल्याचे दर्शन घडविले.

सोहळ्यात आचार्य गुप्तिनंदीजी गुरुदेव यांच्या हस्ते पंचामृत द्रव्यांनी आचार्य सिद्धांतसागरजी महाराजांचे पादप्रक्षालन करण्यात आले. त्यानंतर संघाने आचार्य वंदना केली. धर्मतीर्थ साम्राज्यनायक भगवान शांतिनाथ यांच्या भव्य महामस्तकाभिषेकाचे तसेच सहस्रफणी भगवान पार्श्वनाथ यांच्या १०८ फण्यांतून होणाऱ्या दिव्य अभिषेकाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली.

यावेळी धर्मतीर्थ क्षेत्र तसेच छत्रपती संभाजीनगर येथे प्रस्तावित चातुर्मासासाठी आचार्य सिद्धांतसागरजी महाराजांना श्रीफळ अर्पण करून मंगल निवेदन करण्यात आले.

प्रवचनात आचार्य गुप्तिनंदीजी गुरुदेव म्हणाले, "आचार्य सिद्धांतसागरजी महाराज यांचे धर्मतीर्थावर आगमन हा आमच्यासाठी अत्यंत भाग्याचा आणि आनंदाचा क्षण आहे. त्यांच्या दर्शनाने आम्ही धन्य झालो आहोत." तर आचार्य सिद्धांतसागरजी महाराजांनी धर्मतीर्थ क्षेत्र हे जीवदया, करुणा, अहिंसा आणि धर्मप्रभावनेचे सशक्त केंद्र असल्याचे सांगत क्षेत्राच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. तसेच आचार्य गुप्तिनंदीजी गुरुदेव यांच्या धर्मप्रभावना आणि समाजजागृतीच्या कार्यालाही त्यांनी गौरविले.

या प्रसंगी १८ पिछीधारी साधू-साध्वींचा निरंतराय आहार संपन्न झाला. दोन्ही आचार्यांच्या सान्निध्यात झालेल्या तत्त्वचर्चा आणि धर्मचर्चेमुळे उपस्थित श्रद्धालूंना मौल्यवान आध्यात्मिक मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने साधू-साध्वी, पदाधिकारी आणि जैन समाजातील भाविक उपस्थित होते. अशी माहिती धर्मतीर्थ क्षेत्राचे प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पीयूष कासलीवाल यांनी दिली.

## देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम स्थगित

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील देवस्थानांचे हित, धार्मिक स्वायत्तता आणि सांस्कृतिक वारसा जपण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत वादग्रस्त ठरलेला 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' स्थगित केला आहे. तसेच नव्या कायद्याच्या निर्मितीसाठी सर्वसमावेशक तज्ज्ञ समिती स्थापन करण्याची घोषणाही करण्यात आली आहे.

राज्यातील देवस्थान संस्था, धार्मिक संघटना आणि भाविकांकडून व्यक्त झालेला तीव्र विरोध व लोकभावना लक्षात घेऊन शासनाने हा निर्णय घेतल्याचे मानले जात आहे. शासनाच्या या भूमिकेचे विश्व हिंदू परिषद आणि विविध देवस्थान प्रतिनिधींनी स्वागत केले असून, हा निर्णय धार्मिक संस्थांच्या हिताचे संरक्षण करणारा असल्याचे म्हटले आहे. विश्व हिंदू परिषदेचे क्षेत्र मंत्री रामचंद्र रामूका, मंदिर आयामाचे क्षेत्र प्रमुख अनिल सांबरे आणि देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांचे अभिनंदन करत आभार व्यक्त केले. देवस्थानांचे अधिकार, प्राचीन परंपरा आणि धार्मिक संस्थांचे अस्तित्व अबाधित राखण्यासाठी शासनाने उचललेले हे पाऊल ऐतिहासिक व स्वागतार्ह असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, नव्या कायद्याच्या निर्मितीसाठी स्थापन होणारी तज्ज्ञ समिती राज्यातील विविध धार्मिक संस्था, देवस्थान प्रतिनिधी आणि कायदेतज्ज्ञ यांच्याशी व्यापक सल्लामसलत करणार आहे. सर्व संबंधित घटकांना विश्वासात घेऊनच नव्या कायद्याचा मसुदा तयार केला जाईल, अशी ग्वाही शासनाने दिली आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील हजारो देवस्थानांना आणि त्यांच्याशी संबंधित लाखो भाविकांना मोठा दिलासा मिळाला असून धार्मिक क्षेत्रातून या निर्णयाचे उत्स्फूर्त स्वागत होत आहे.

## पोलीस पाल्यांची यशोगाथा; गुणवंतांचा ग्रामीण पोलीस दलाकडून गौरव

## 'मोठी स्वप्ने पाहा, पोलीस प्रशासन तुमच्या पाठीशी' : पो. अ. प्रकाश जाधव




हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील दहावीच्या परीक्षेत ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा विशेष गौरव सोहळा शनिवारी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस मुख्यालयात उत्साहात पार पडला.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी जाधव यांनी गुणवंत विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या भविष्यातील ध्येयांविषयी जाणून घेतले. "मोठी स्वप्ने पाहा, सातत्यपूर्ण परिश्रम आणि शिस्तीच्या बळावर ती पूर्ण करा. तुमच्या उच्च शिक्षणासाठी पोलीस प्रशासन कायम पाठीशी उभे राहील," असे मार्गदर्शन त्यांनी केले.

अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांनीही विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन करत या यशातून इतर पोलीस पाल्यांना प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमात दहावीच्या परीक्षेत ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवलेल्या नऊ विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. अनुष्का दत्तात्रय सुयवंशी (९५.४०%), सारिका योगेश तरमाळे (९४.८०%), ओमकार दत्तात्रय सुयवंशी (९४.७६%), हर्षल सुनिल पवार (९४%), देवेन विनोद पदमणे (९३.२०%), सिद्धांत सुनिल ठोंबरे (९३%), आकांक्षा महेश घुगे (९२.०६%), तनुजा शिवाजी मुदेवाड (९१.६०%) आणि रुषी भानुदास चव्हाण (९१.६०%) यांचा यामध्ये समावेश होता.

पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम संपूर्ण पोलीस कुटुंबासाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाचे आभार सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांनी मानले.

CHANGE OF NAME
दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

I, Nuzhat Fatema Mohammed Saleemuddin, residing at H. No. 8-7-293, Ganesh Colony, Chhatrapati Sambhajinagar, hereby declare that "Nuzhat Fatema" and "Nuzhat Fatema Mohammed Saleemuddin" are one and the same person.

# अवलिया शिल्पकार भास्कर सिल्लोडे पानवडोदकर यांच्या कलाकृतींचा राज्यभर गौरव; शेकडो मूर्तींमधून जपली कला आणि संस्कृती

हिन्दू प्रकाशवार्ता / सय्यद जमीरोद्दीन

**अजिंठा :** आपल्या कुशल हातांनी माती, प्लास्टर, फायबर आणि विविध धातूंना कलात्मक रूप देत शेकडो आकर्षक मूर्ती साकार करणारे अवलिया शिल्पकार भास्कर सिल्लोडे पानवडोदकर यांनी शिल्पकलेच्या माध्यमातून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या हातून साकारलेल्या विविध महापुरुष, संत, समाजसुधारक, देवी-देवतांच्या तसेच ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या मूर्तींना राज्यभरातून मोठी मागणी होत आहे.

लहानपणापासूनच कलेची आवड असलेल्या भास्कर सिल्लोडे यांनी कोणत्याही मोठ्या शैक्षणिक संस्थेचा आधार न घेता स्वतःच्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर शिल्पकलेत प्रभुत्व मिळविले. सुरुवातीच्या काळात अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून काम सुरू केलेल्या सिल्लोडे यांनी आपल्या कलागुणांच्या बळावर आज अनेकांच्या मनात स्थान निर्माण केले आहे.







त्यांनी आतापर्यंत श्री गणेश, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, अहिल्यादेवी होळकर, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत गाडगेबाबा यांच्यासह अनेक ऐतिहासिक व धार्मिक व्यक्तिमत्त्वांच्या मूर्ती घडवल्या आहेत. त्यांच्या मूर्तींमध्ये वास्तवदर्शी भाव, आकर्षक रंगसंगती आणि सूक्ष्म कलाकुसर पाहायला मिळते.

विशेष म्हणजे, मूर्ती तयार करताना ते संबंधित व्यक्तिमत्त्वाचा इतिहास, वेशभूषा, देहबोली आणि चेहऱ्यावरील भाव यांचा सखोल अभ्यास करतात. त्यामुळे त्यांच्या कलाकृती केवळ मूर्ती न राहता त्या इतिहास आणि संस्कृतीचे जिवंत दर्शन घडवतात. अनेक शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक मंडळे, सामाजिक संस्था आणि धार्मिक ट्रस्ट यांनी त्यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली आहे.

गणेशोत्सव, शिवजयंती, आंबेडकर जयंती, संत महोत्सव आणि विविध धार्मिक उत्सवांमध्ये त्यांच्या कलाकृतींना विशेष मागणी असते. अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक संघटनांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या कलाकृतींमुळे सिल्लोड तालुक्यासह पानवडोद गावाचे नाव राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहे.

शिल्पकलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, इतिहास आणि परंपरा जतन करण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत. नव्या पिढीने मोबाईल आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात पारंपरिक कला जपण्यासाठी पुढे यावे, असे आवाहनही ते वेळोवेळी करतात. अनेक युवकांना त्यांनी शिल्पकलेचे प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ व्यवसाय म्हणून नव्हे तर समाजप्रबोधनाचे माध्यम म्हणून शिल्पकलेकडे पाहणारे भास्कर सिल्लोडे पानवडोदकर हे मराठवाड्याच्या कला क्षेत्रातील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरत आहेत. त्यांच्या कलाकृतींमधून कला, संस्कृती आणि इतिहास यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळत असून भविष्यातही त्यांच्या हातून अनेक दर्जेदार कलाकृती घडतील, असा विश्वास कला रसिक व्यक्त करत आहेत.

# परांड्यात पहाटेच 1 कोटींचा गुटखा जप्त, गोदामे सील

**परंडा (जि. धाराशिव) :** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार घेतल्यानंतर निद्रिस्त अधिकारी खडबडून जागे झाले आहेत. धाराशिव जिल्ह्यात खवा, दुधावर धाडी झाल्यानंतर आता शुक्रवारी पहाटे ५ वाजता चार जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांनी परंडा शहरात गुटखा गोदामांवर अचानक सर्जिकल स्ट्राइक केला. एकाचवेळी चार ठिकाणी टाकलेल्या धाडीत तब्बल १ कोटी २ लाखांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे आणि सह-आयुक्त श्रीकांत करकाळे यांच्याकडे परंडा शहरात प्रतिबंधित गुटख्याचा मोठा साठा करून ठेवण्यात आल्याची माहिती पोहोचली होती. त्यांनी लागलीच सांगली, पुणे, धाराशिव आणि सोलापूर येथील अधिकाऱ्यांच्या टीम तयार करून गोपनीयरीत्या धाडीचे नियोजन आखले. ठरल्याप्रमाणे ५ जूनच्या पहाटे ५ वाजता या पथकांनी परंडा शहरात चार ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले. ही कारवाई इतकी गोपनीय ठेवली होती की, स्थानिक प्रशासनालाही ऐनवेळी याची कल्पना देण्यात आली.

शहरातील बावची चौक परिसरातील तीन वेगवेगळ्या गोदामांवर टाकलेल्या धाडीत तब्बल १ कोटी १ लाख ८८ हजार ५०८ रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. सोबतच बस स्थानक रोड भागातील एका बेकरीजवळ केलेल्या कारवाईत ७८,७५५ रुपयांचा गुटखा सापडला. याप्रकरणी परंडा पोलिसांत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया रात्री सुरू होती. सहायक आयुक्त प्रमोदकुमार काकडे, संतोष सावंत, डॉ. सुमित खांडेकर, वीर स्वामी, उमेश भुसे, धनंजय आगाव, रोहित फंदी, गणेश दत्तू, अभिजित झोडगे, ऋषिकेश मते यांच्यासह परंडा ठाण्याच्या पोलिसांचा ताफा या धाडीत सहभागी होता.

**गुटखा कोणाचा, तपासाला सुरुवात :** अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईत जप्त केलेला गुटखा परंडा पोलिस ठाण्यात ठेवण्यात आला आहे. सध्या या गुटख्याचा मुख्य मालक कोण आहे ?, ज्या गोदामात हा साठा सापडला तो कोणाचा आहे?, ते कोणाला भाड्याने दिले होते? या दिशेने तपासाला सुरुवात झाली आहे.

**एकही टपरी उघडली नाही :** या कारवाईची माहिती पसरताच परंडा शहरातील गुटखा विक्री करणाऱ्या सर्व टपऱ्या आणि दुकाने दिवसभर बंद दिसून आली. कारवाईच्या भीतीने अनेक विक्रेते शहराबाहेर गेल्याचेही समजले. दरम्यान, जप्त केलेला गुटखा इतक्या मोठ्या प्रमाणात होता की, तो ठाण्यात नेण्यासाठी मोठ्या टेम्पोला दोन फेऱ्या माराव्या लागल्या.

# स्टॉर्म फिटनेस अँड MMA चा विद्यार्थी ऋषी पंजवानी याची आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी




**उरण रायगड :** स्टॉर्म फिटनेस अँड MMA चा विद्यार्थी ऋषी पंजवानी याने ओडिशा येथे आयोजित WAKO इंडिया ज्युनिअर नॅशनल किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२६ मध्ये सुवर्णपदक (Gold Medal) पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली असून त्याची आता आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर ऋषीने ही निवड मिळवली असून, त्याच्या कठोर परिश्रम, शिस्त, समर्पण आणि जिद्दीचे हे फळ आहे. त्याच्या या यशामुळे स्टॉर्म फिटनेस अँड MMA चा तसेच उरण शहर तसेच संपूर्ण रायगड जिल्ह्याचा गौरव वाढला आहे.

याप्रसंगी स्टॉर्म फिटनेस अँड MMA चे प्रशिक्षक, पदाधिकारी आणि सदस्यांनी ऋषीचे अभिनंदन करून आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.देशाचे प्रतिनिधित्व करताना तो उत्कृष्ट कामगिरी करून भारताचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.ऋषी पंजवानीचे हे यश युवा खेळाडूंना प्रेरणा देणारे असून, क्रीडा क्षेत्रात मोठी स्वप्ने पाहणाऱ्या खेळाडू क्रीडा पटू साठी एक आदर्श उदाहरण आहे.ऋषी पंजवानी याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वच स्तरातून कौतुक होत असून त्यांच्यावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# श्री क्षेत्र वेरूळ येथील मालोजीराजे भोसले गढी वर शिवराज्याभिषेक सोहळा राजेंद्र पवार यांच्या पुढाकारातून मोठ्या उत्साहात संपन्न

हिंदू प्रकाश वार्ता / संतोष करपे



**खुलताबाद प्रतिनिधी ६ जून :** स्वराज्य संकल्प भूमी पितृ तीर्थ श्रीक्षेत्र वेरूळ येथे शहाजीराजे भोसले स्मारकासमोर ५१ विविध क्षेत्रातील मान्यवर जोडप्यांच्या हस्ते सामूहिक शिव राज्याभिषेक सोहळा श्री क्षेत्र वेरूळ येथे मालोजी राजे भोसले गडीवर सकाळी आठ ते दहा वाजेच्या दरम्यान प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांच्या पुढाकारातून संलग्न तिसऱ्या वर्षी मोठ्या उत्साहात संपन्न झाला

हा सोळा यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे राजू चव्हाण गणपत मस्के मनोहर गावडे संदीप मोडके विष्णू पवार कडूबा जगताप नितीन काळे अनिल पाटील मिसाळ सागर पाटील मतकर व सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले अशी माहिती आयोजन समितीचे राजेंद्र पवार यांनी दिले

या सोहळ्यासाठी छत्रपती संभाजी नगर जिल्हा व महाराष्ट्र मधील ५१ मान्यवरांची सह पत्नीक उपस्थिती होती त्यांच्या शुभ असते छत्रपती शिवरायांच्या ५१ मूर्तींचा सामूहिक अभिषेक संपन्न संपन्न झाला यावर्षी अतिशय नियोजनबद्ध या सोहळ्याचे आयोजन केलेले होते हे तिसरे वर्ष असून यावर्षी सामाजिक वैद्यकीय शैक्षणिक उद्योग विधीतज्ञ आध्यात्मिक क्षेत्रातील श्री विवेकानंद महाराज नाथ आश्रमाचे अक्का महाराज सह राजकीय क्षेत्रातील महत्त्वाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी उपस्थित होते प्रामुख्याने महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल सावे जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदिपान भुमरे जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील संभाजीनगर शहराचे महापौर समीर राजूरकर यांनी मुख्य व्यासपीठावर शिव मूर्तीला अभिषेक केला निवडक ५१ मान्यवरांमध्ये नगरसेवक विश्वनाथ स्वामी नगरसेवक माधुरीताई आदमंत नगरसेवक शिवाजीराव दांडगे जिल्हा परिषद सदस्य कुणाल दांडगे जिल्हा परिषद सदस्य सौ रेखा प्रकाश चव्हाण जिल्हा परिषद सदस्य सौ प्रतीक्षा विकास कापसे खुलताबाद पंचायत समिती सभापती सौ सुनीता संजय पाटील खंडागळे उपसभापती सौ मंदा बद्रीनाथ वाकळे पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे नारायण बर्डे खुलताबाद नगरसेवक परसराम पाटील बारगळ कैलास पाटील बारगळ महानगरपालिका प्रभाग क्रमांक २५ . नगरसेवक सौ प्रियंका दीपक कोतकर रामेश्वर कोरडे सरपंच प्रकाश पाटील मिसाळ यांची उपस्थिती होती या

वरील प्रमुख मान्यवरांना महाराष्ट्रातील सर्व शिवभक्ताच्या वतीने स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी लिखित स्वरूपामध्ये निवेदन दिले आहे की या ऐतिहासिक जागेचा विकास होण्यासाठी मुख्यमंत्री महोदयकडे बैठक लावावी मालोजीराजे भोसले गडीच्या संदर्भात चार प्रमुख मागण्या यावेळी केले असून या जागेचं महत्त्व फक्त स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची जन्मभूमी असल्यामुळे पितृ तीर्थ म्हणून या घडीला घोषित

## नका करू पर्यावरणाचा नाश नाही तर होईल जीवसृष्टीचा विनाश-सीडीसीएच्या फेरीतून जनजागृती

**छत्रपती संभाजीनगर:** सायकल चालवा पर्यावरण वाचवा ,निसर्गाचा अनमोल ठेवा,सदा परिसर कचरामुक्त ठेवा,या सृष्टीला हिरवा शालू आपण सारे घालू असे संदेश देत जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सामाजिक वनीकरण विभाग व छत्रपती संभाजीनगर जिल्हा सायकलिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी सकाळी सायकल फेरीचे आयोजन करण्यात आले.होते. उस्मानपुरा येथील सामाजिक वनीकरण विभाग कार्यालय येथून सकाळी सात वाजता



या उपक्रमास मान्यवरांसह हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला.यावेळी वेदांतनगर पोलीस ठाण्यातील निरीक्षक विभागीय वन अधिकारी संदीप गिरी,उपवनसंरक्षक,सामाजिक वनीकरण बाळकिशोर अर्जुन पोळ,वनसंरक्षक प्रमोदचंद्र लकरा यांची प्रमुख उपस्थिती होती. ही सायकल फेरी बाबा पेट्रोल पंप ,रेल्वेस्टेशमार्गे पुन्हा सामाजिक वनीकरण कार्यालयात पोहोचली.यात सहभागी सायकलस्वारांना टी-शर्ट,प्रमाणपत्र व अल्पोपाहार वाटप करण्यात आला.या उपक्रमात 100 नागरिक सहभागी झाले होते.

सीडीसीए सचिव चरणजितसिंग संघा, राजकुमार मनमोहन मालानी,अमोघ जैन,सहसचिव अतुल जोशी,उन्मेष मारवाडे,मोहन उन्हाळे,ऋषिकेश मिसाळ,सतीश पुरुषोत्तम अन्वेकर, संतोष हिरेमठ, अनिल सुलाखे,चेतन मालानी, मनप्रीतकौर संघा,पोलिस कर्मचारी रमेश भालेराव, तेजस्विनी सायकलिंग क्लबच्या अध्यक्षा निता गंगावणे,आदेश काब्रा,सचिन गोडसे,इंदूप्रसाद आदींनी यात सहभाग घेतला.

# क्रांती चौकात देवगिरी बँकेचा डिजिटल तापमान मापक बोर्ड सुरु

## शिवराज्याभिषेक दिनी मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते लोकार्पण

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या शुभमुहूर्तावर देवगिरी नागरी सहकारी बँकेच्या वतीने क्रांती चौक येथे अत्याधुनिक डिजिटल तापमान मापक बोर्ड उभारण्यात आला असून, या उपयुक्त सुविधेचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांना तापमानासह हवेची गुणवत्ता आणि आर्द्रतेची अद्ययावत माहिती सहज उपलब्ध होणार आहे.

क्रांती चौक येथे झालेल्या कार्यक्रमास शहराचे महापौर समीर राजुरकर, स्थायी समितीचे सभापती अनिल मकरीये यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी बँकेच्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती देताना सामाजिक बांधिलकी जपत बँक सातत्याने लोकहिताचे प्रकल्प राबवत असल्याचे सांगितले.

या प्रसंगी बँकेचे संचालक नागनाथ काजळे, सुरेश जगाडे, जयश्री किवळेकर, डॉ. क्षमादेवी खोब्रागडे तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी रूपेंद्र कोयाळकर उपस्थित होते.

शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या क्रांती चौकात उभारण्यात आलेल्या या डिजिटल बोर्डावर तापमान, हवेतील आर्द्रता (Humidity) तसेच हवेचा गुणवत्ता निर्देशांक (Air Quality Index) प्रदर्शित केला जाणार आहे. भविष्यात शहरातील इतर प्रमुख चौकांमध्येही अशा प्रकारचे डिजिटल माहिती फलक उभारण्याचा बँकेचा मानस असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

देवगिरी बँकेच्या या लोकाभिमुख उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून, शहराच्या स्मार्ट आणि माहितीपूर्ण विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# घृष्णेश्वर मंदिरचा होणार जागतिक दर्जाचा विकास

## अतिक्रमणधारकावर होणार कारवाई

**खुलताबाद :** तालुक्यातील येथील घृष्णेश्वर मंदिर संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. तयामुळेच जागतिक दर्जाचा विकास केल्याने परिसर विकासांतर्गत येथे शासन निधीतून अत्यंत महत्त्वाच्या 'भुयारी मार्गाचे' (सुबवाय ) काम मंजूर झाले आहे. मात्र, रस्त्यावरील या पक्क्या व कच्च्या अतिक्रमणांमुळे हे काम पूर्णपणे रखडले आहे.

'मुंबई महामार्ग अधिनियमा'नुसार कारवाई; खर्चही वसूल करणार!

सार्वजनिक बांधकाम उप-विभागाच्या उपविभागीय अभियंत्यांनी जारी केलेल्या नोटीसमध्ये स्पष्ट केले आहे की, नोटीस मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत संबंधितांनी स्वतःच्या खर्चाने ही अतिक्रमणे काढून जागा पूर्ववत करावी. दिलेल्या मुदतीत अतिक्रमण न हटवल्यास,

कायदेशीर फौजदारी कारवाई केली जाईल. तसेच, हे अतिक्रमण हटवण्यासाठी प्रशासनाला जो खर्च येईल, तो देखील संबंधित अतिक्रमणधारकांकडूनच वसूल केला जाणार आहे.

**नुकसानीस आणि कायदा-सुव्यवस्थेस व्यावसायिकच जबाबदार! :** प्रशासनाने नोटीसद्वारे सज्जड दम दिला आहे की, "प्रशासनाकडून अतिक्रमण काढताना होणाऱ्या तोडफोडीस किंवा नुकसानीस शासन जबाबदार राहणार नाही. तसेच, या कारवाईदरम्यान कोणतीही कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास, त्याला संबंधित व्यावसायिकच सर्वस्वी जबाबदार राहतील.

सहाय्यक अभियंत्यांवर जबाबदारी; व्यापाऱ्यांमध्ये खळबळ!

या मोहिमेची कडक अंमलबजावणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उप-विभागाचे सहाय्यक अभियंता (श्रेणी-२) एस.के.चव्हाण यांच्याकडे पुढील कारवाईची थेट जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ७ दिवसांची मुदत संपताच या परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाचा 'बुलडोझर' फिरणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाल्याने, अतिक्रमणधारक आणि स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये कमालीची खळबळ उडाली आहे.

# प्रभाग 29 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त मनपा प्रभाग क्र. २९ अंतर्गत सातारा, विटखेडा, कांचनवाडी व नक्षत्रवाडी परिसरात अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले तसेच "जय भवानी, जय शिवाजी"च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमास शहराचे माजी महापौर श्री. नंदकुमार घोडेले,रामचंद खडके सावळेराम शेळके मोहन काका जगदाळे बाबासाहेब खडके परमेश्वर आगळे वैभव भानुसे संतोष खडके ऋषी खडके, विजू महाराज ,जगदाळे, सांडू जगदाळे ,देशपांडे मोरे, सोनवणे, धाडे ,तसेच गौतम सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपत स्वराज्य, राष्ट्रभक्ती व समाजसेवेची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास नागरिक व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीडच्या लेकींची गगनभरारी; ऊसतोडणी कामगाराच्या चार सख्ख्या बहिणी एकाच वेळी झाल्या पोलीस

## डोंगराळ भागातील जिवाचीवाडी गावच्या कन्यकांचा मुंबई पोलीस दलात डंका; बिकट परिस्थितीवर मात करत घडवला इतिहास

हिंदु प्रकाश वार्ता | प्रतिनिधी

**बीड :** ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी ओळख असलेल्या बीड जिल्ह्यातील चार सख्ख्या बहिणींनी मिळवलेल्या अभूतपूर्व यशामुळे संपूर्ण राज्यात कौतुकाचा वर्षाव होत आहे. एका सामान्य ऊसतोडणी करणाऱ्या शेतकऱ्याच्या चार मुलींनी थेट मुंबई पोलीस दलात स्थान मिळवून गगनभरारी घेतली आहे. कोणत्याही प्रकारची पुरेशी संसाधने उपलब्ध नसताना आणि गरिबीशी दोन हात करत या तरुणींनी मिळवलेले हे यश केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नाही, तर संपूर्ण जिल्ह्यासाठी एक मोठा प्रेरणास्थान बनले आहे.

बीड जिल्ह्यातील डोंगराळ भागात वसलेल्या जिवाचीवाडी या छोट्याशा खेड्यातील ऊसतोड कामगार हनुमंत चौरे यांच्या या चारही मुली आहेत. उषा, अर्चना, गीतांजली आणि शितल अशी या रणरागिणींची नावे आहेत. जिवाचीवाडी सारख्या ग्रामीण आणि दुर्गम भागात अनेकदा मुलींच्या सुरक्षेचे कारण पुढे करून त्यांचे बालपणातच विवाह लावून देण्याची प्रथा पाहायला मिळते. मात्र, अशा रूढी-परंपरांना आणि सामाजिक चौकटीला छेद देत या चारही बहिणींनी शिक्षणाचा आणि खाकी वर्दीचा मार्ग निवडला. त्यांचे आई-वडील आजही पोटाची खळगी भरण्यासाठी ऊस तोडणीचे अत्यंत कष्टाचे काम करतात. कुटुंबाची



आर्थिक परिस्थिती कमालीची हालाखीची असतानाही, या मुलींनी आपल्या मनात खाकी वर्दीचे स्वप्न जिवंत ठेवले.

असंख्य आर्थिक अडचणी, कौटुंबिक आव्हाने आणि मर्यादा असूनही वडील हनुमंत चौरे यांनी आपल्या मुलींच्या शिक्षणात कोणतीही कसर सोडली नाही आणि त्यांच्या स्वप्नांना नेहमीच बळ दिले. वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून या चारही बहिणींनी अत्यंत जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर मुंबई पोलीस दलाच्या भरती प्रक्रियेत घवघवीत यश संपादन केले. एकाच घरातील चार सख्ख्या बहिणींची एकाच वेळी पोलीस दलात निवड होण्याची ही राज्यातील दुर्मिळ घटना असावी. या कौतुकास्पद कामगिरीमुळे सध्या जिवाचीवाडी गावासह संपूर्ण बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, आई-वडिलांचा ऊर अभिमानाने भरून आला आहे. सोशल मीडियासह सर्वच स्तरातून या चौरे भगिनींवर शुभेच्छा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911